# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः05.10.2024** **वारःशनिवार**

---

1. राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत विविध जिल्ह्यांतल्या विकासकामांना मंजूरी
2. 3 ऑक्टोबर हा दिवस यापुढे 'मराठी अभिजात भाषा गौरव दिन' म्हणून साजरा होणार
3. पंतप्रधानांच्या हस्ते आज वाशिम, मुंबई आणि ठाण्यातल्या विकासकामांचं उद्धाटन आणि पायाभरणी
4. रेल्वेचं खाजगीकरण कधीच होणार नाही-रेल्वेमंत्र्यांचं स्पष्टीकरण आणि
5. राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांमुळे आर्थिक विकासाला गती मिळेल, केंद्रिय मंत्री नितीन गडकरी यांचा विश्वास

**मंत्रीमंडळ निर्णय**

राज्य मंत्रीमंडळाच्या काल झालेल्या बैठकीत गावठाणाबाहेरील, शहरातल्या बहुमजली इमारतींखालील तसंच वाणिज्य आणि औद्योगिक वापरातल्या जमिनींवरचा अकृषिक कर माफ करण्याचा निर्णय घेण्यात आला. राज्यातल्या प्राचीन आणि ऐतिहासिक वास्तूंचं नुकसान केल्यास दोन वर्षांच्या तुरुंगवासाची आणि एक लाख रुपयांपर्यंतच्या दंडाची तरतूद कालच्या बैठकीत करण्यात आली. पुणे शहराभोवतीच्या वर्तुळाकार रस्ता प्रकल्पालाही यात मंजूरी देण्यात आली.

पुणे जिल्ह्यात दौंड इथं बहुउद्देशीय सभागृहासाठी नगरपंचायतीला शासकीय जमीन उपलब्ध करुन देणं, नाशिक जिल्ह्यातल्या त्र्यंबकेश्वर तालुक्यातल्या किकवी प्रकल्पाशी संबंधित विविध कामांना मान्यता, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या पूर्णा नदीवरच्या दहा साखळी बंधाऱ्यांना मान्यता, तसंच आंतरराष्ट्रीय स्तरावर महाराष्ट्राचं नाव उज्ज्वल करणारे खेळाडू आणि त्यांच्या प्रशिक्षकांच्या पारितोषिकांच्या रक्कमेत वाढ करण्याला काल मान्यता देण्यात आली. ऊसतोड कामगारांसाठी अपघात विमा योजना, लहान विद्युत प्रकल्प आणि सौर उर्जा प्रकल्पांचा, बांधा, वापरा, हस्तांतरित करा तत्त्वावर विकास करणं, कोकण आणि पुणे विभागासाठी राज्य आपत्ती प्रतिसाद दलाच्या दोन कंपन्या स्थापन करण्याला मान्यता, त्याचबरोबर आरोग्य क्षेत्रातली उत्कृष्टता केंद्रं स्थापन करणं, जैन, बारी, तेली, हिंदू-खाटीक, लोणारी या समाजांसाठी आर्थिक विकास महामंडळ स्थापन करण्याचे निर्णय मंत्रीमंडळानं या बैठकीत घेतले.

**अभिजात दर्जा**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याचं जाहीर झाल्यानंतर काल राज्य मंत्रिमंडळानं पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्रिमंडळाचं अभिनंदन केलं. तसंच 3 ऑक्टोबर हा दिवस यापुढे 'मराठी अभिजात भाषा गौरव दिन' म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान काल राज्यात ठिकठिकाणी विविध संस्था, संघटनांकडून मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याबद्दल आनंदोत्सव साजरा करण्यात आला. पुणे पुस्तक महोत्सवातर्फे पुण्यात झालेल्या आनंदोत्सवाला केंद्रातले राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्यासह साहित्य, सामाजिक संस्था, शिक्षण, कला क्षेत्रातले मान्यवर उपस्थित होते. नवी मुंबईत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेनं फटाके वाजवून, एकमेकांना पेढे देऊन हा आनंद साजरा केला. नाशिकमध्ये शिवसेनेतर्फे कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या स्मारकस्थळी जल्लोष करण्यात आला.

**<u>पंतप्रधान दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज राज्याच्या दौऱ्यावर येणार आहेत. वाशिम इथं आज पंतप्रधानांच्या हस्ते बंजारा विरासत संग्रहालयाचं उद्घाटन होणार आहे. त्यानंतर कृषी आणि पशुपालन क्षेत्राशी संबंधित सुमारे 23 हजार 300 कोटी रुपये खर्चाच्या विविध उपक्रमांचा प्रारंभ पंतप्रधानांच्या हस्ते होईल. संध्याकाळी पंतप्रधान ठाण्यातल्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी करतील. मुंबईतल्या मेट्रो मार्ग 3 च्या आरे जेव्हीएलआर ते बीकेसी विभागाचं उद्घाटनही पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते होणार आहे.

**<u>युनेस्को-सातारा</u>**

जागतिक वारसा स्थळांच्या यादीत नामांकनाच्या संदर्भात पाहणी करण्यासाठी युनेस्कोच्या पथकानं काल प्रतापगडाला भेट दिली. यावेळी पथकाने किल्ल्यावरील ऐतिहासिक वास्तूंची पाहणी करून त्यांची माहिती जाणून घेतली. किल्ल्याची तटबंदी आणि अन्य वास्तूंची जपणूक करणाऱ्या सेवेकऱ्यांचं त्यांनी कौतुक केलं.

**<u>केंद्रिय रेल्वे सुरक्षा दल स्थापना दिन-नाशिक</u>**

सर्वसामान्यांच्या प्रवासाचं प्रमुख साधन असलेल्या रेल्वेमध्ये केंद्र सरकारनं गेल्या दहा वर्षात मोठी गुंतवणूक केली आहे असं सांगून, रेल्वेचं खाजगीकरण कधीच केलं जाणार नाही असं केंद्रिय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी स्पष्ट केलं आहे. ते काल नाशिक इथं केंद्रिय रेल्वे सुरक्षा दलाच्या स्थापना दिन कार्यक्रमात बोलत होते. यावेळी केंद्रीय सुरक्षा दलानं विकसित केलेल्या सज्ञान या कायदेविषयक मार्गदर्शन करणाऱ्या मोबाईल ऍपचं लोकार्पण वैष्णव यांच्या हस्ते करण्यात आलं. पुणे नाशिक हायस्पीड रेल्वे प्रकल्पाबाबत बोलताना वैष्णव म्हणाले......

राज्यातल्या 132 रेल्वेस्थानकांचं पुनर्निर्माण करण्यात येत असून, यात नाशिकरोड, नांदगाव, लासलगाव रेल्वेस्थानकांचा समावेश आहे. कांदा, द्राक्षं, डाळिंबं आणि केळी उत्पादकांसाठी, त्यांच्या एकूण मागणीनुसार विशिष्ट आकाराच्या बोगी तयार करण्यात येणार आहेत, असं रेल्वेमंत्र्यांनी सांगितलं.

**<u>नितीन गडकरी-सांगली</u>**

दहिवडी-मायणी-विटा रस्त्यामुळे राष्ट्रीय महामार्गाची सांगली जिल्ह्यातली लांबी जवळपास 600 किलोमीटरपर्यंत पोहोचली असून सांगली तासगाव बाह्य वळण मार्गालाही मंजूरी देण्यात आली आहे अशी माहिती केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिली. दहिवडी-मायणी-विटा रस्त्याच्या कामाचं भूमीपूजन काल गडकरी यांच्या हस्ते झालं, त्यावेळी ते बोलत होते. या राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांमुळे आर्थिक विकासाला गती मिळेल, असं गडकरी यावेळी म्हणाले. नवीन मुंबई-पुणे-बंगळुरू द्रुतगती मार्ग बांधायचं ठरवलं असून या मार्गावर 5 ठिकाणी विमान उतरण्याची सोय करण्यात आली आहे असं त्यांनी सांगितलं. तसंच या नवीन द्रुतगती मार्गामुळे दुष्काळी भागाच्या आर्थिक विकासासाठी मदत होईल, असा विश्वास व्यक्त केला. सांगलीतल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचं अनावरण, नवीन सभागृहाचं उद्घाटन आणि अमृत महोत्सवी स्मरणिकेचं प्रकाशन गडकरी यांच्या हस्ते झालं. या कार्यक्रमात बोलताना गडकरी म्हणाले......

**<u>रत्नागिरी प्रकल्प</u>**

रत्नागिरी जिल्ह्यात 29 हजार 550 कोटी रुपयांच्या दोन प्रकल्पांना मंत्रीमंडळ बैठकीत मंजुरी मिळाली आहे. राज्याचे उद्योगमंत्री आणि रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी दूरस्थ प्रणालीद्वारे घेतलेल्या पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. सेमीकंडक्टर निर्मिती आणि संरक्षण उत्पादन क्षेत्रातले हे प्रकल्प रत्नागिरी तालुक्यातल्या वाटद आणि झाडगाव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ क्षेत्रात होणार आहेत.

**<u>राहुलगांधी-कोल्हापूर</u>**

लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि काँग्रेस खासदार राहुल गांधी यांचा कालचा कोल्हापूर दौरा अचानक रद्द करण्यात आला. विमानातील तांत्रिक बिघाडामुळे हा दौरा पुढे ढकलला असून आता राहुल गांधी आज सकाळी साडेआठ वाजता कोल्हापुरात येणार असल्याचं आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**<u>राज्यपाल-बुलडाणा</u>**

बुलडाणा जिल्ह्याचा औद्योगिकदृष्ट्या विकास करण्यासाठी जिल्ह्यात उद्योग प्रकल्प सुरु होणे गरजेचे असून त्यासाठी विशेष मोहीम राबवण्याच्या सूचना राज्य शासनाला करणार आहे असं राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन् यांनी सांगितलं. ते काल बुलडाणा इथं बोलत होते. जिल्ह्यातले प्रशासकीय अधिकारी, राजकीय पक्षाचे प्रतिनिधी, उद्योजक, पत्रकार, खेळाडू आणि सामाजिक संस्थांच्या पदाधिकाऱ्यांसोबत त्यांनी काल विविध विषयांवर चर्चा करुन शासनाच्या उपाययोजना सांगितल्या.

**<u>क्रिकेट</u>**

महिलांच्या टी-20 विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धेत पहिल्याच सामन्यात काल भारताला पराभवाचा सामना करावा लागला. या सामन्यात न्यूझीलंडनं भारताचा 58 धावांनी पराभव केला. न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करताना 4 गडी गमावून 160 धावा केल्या; प्रत्युत्तरात भारताचा संघ 102 धावांवर गारद झाला.

**<u>हवामान</u>**

येत्या 24 तासात राज्यातल्या सर्व विभागांत तुरळक ठिकाणी पावसाचा अंदाज हवामान विभागानं व्यक्त केला आहे. मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी वीजांसह पाऊस पडेल असं हवामान विभागानं म्हटलं आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.